| | | | |
|---|---|---|---|
| CNR No- MHRT090001962014 | **दाखल तारीख** | : | १५/०७/२०१४ |
| | **नोंदणी दिनांक** | : | १५/०७/२०१४ |
| | **निकाल तारीख** | : | **१७/०४/२०२६** |
| | **कलावधी** | : | वर्षे महिने दिवस |
| | | | ११ ०९ ०२ |

**फॉर्म नं. XXXII**

**भाग 'अ'**

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i))

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा, ता.लांजा, जि.रत्नागिरी यांच्या न्यायालयात**

**(एस. आर. जोशी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी लांजा यांचेसमोर)**

**(न्यायनिर्णय दिनांक –१७/०४/२०२६)**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक १२/२०१४**

**निशाण– १७२**

| | | |
|---|---|---|
| | गु.र.क्र. २७/२०१४ लांजा पोलीस ठाणे, लांजा<br>भारतीय दंड संहिता कलम ३४१, ३२४, ३२३, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ अन्वये गुन्हा | |
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासनाकरीता तपासिक अंमलदार लांजा पोलीस ठाणे, ता. लांजा, जि.रत्नागिरी.** | |
| **अभियोग पक्षातर्फे प्रतिनिधीत्व** | **श्री. एस. एस. वळवी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.** | |
| **आरोपी** | १. | **सुनिल महादेव भोसले,**<br>वय ३७ वर्षे, व्यवसाय– नोकरी,<br>रा.खारदांडा प्यारेनगर, बच्चीबाईचाळ रूम नं. १४७<br>खार वेस्ट मुं. नं. ५२ |
| | २. | **विजय रघुनाथ शिंदे,** |

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:41:02 +0530

| | | |
|---|---|---|
| | | वय ३२ वर्षे, व्यवसाय– मजूरी,<br>रा.राई मुधा मोरवा गांव शंकर मंदीर समोर विनायक पाटील चाळ भाईंदर वेस्ट. |
| | ३. | **राजु उर्फ यल्लापा कदर,**<br>वय २७ वर्षे, व्यवसाय– झाडु विकणे,<br>रा.सायन धारावी विजय नगर ९० फुट रूम नं. ९१२. |
| | ४. | **यासिन मदार शेख,**<br>वय ३० वर्षे, व्यवसाय– चालक,<br>रा.मुब्रा कौसा रशिद कंपाऊंड दारूफला मंदीर कब्रस्तानचे शेजारी ठाणा मुंब्रा. |
| | ५. | **आशिष अंकुश कसबे,**<br>वय ३२ वर्षे, व्यवसाय– नोकरी,<br>रा.न्यु हनुमान नगर रहिवासी संघ दांडा खारवेस्ट मुं. ५२. |
| | ६. | **संजय उर्फ कांचा गोपाळ विश्वकर्मा,**<br>वय २१ वर्षे, व्यवसाय– कुक,<br>रा.सांताक्रुझ गझधर बांध आग्रीपाडा ऑपझिट साईबाबा मंदिर रू. नं. ४७ |
| **आरोपीं तर्फे प्रतिनिधीत्व** | **वकील श्री. एम. व्ही. मांडवकर.** | |

**भाग 'ब'**

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(**ii**))

| | |
|---|---|
| **गुन्हयाची तारीख** | ०७/०५/२०१४ |
| **फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख** | ०७/०५/२०१४ |
| **दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख** | १५/०७/२०१४ |

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:41:12 +0530

| | |
|---|---|
| **आरोपी विरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख** | १५/०७/२०१४ |
| **पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख** | १९/०९/२०२५ |
| **निकालाची आरक्षीत तारीख** | लागू नाही |
| **निकालाची तारीख** | १७/०४/२०२६ |
| **जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख** | लागू नाही |

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जामिनावर सोडलेची तारीख** | **दोषारोप ठेवलेले गुन्हे** | **निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली** | **दिलेली शिक्षा** | **फौ.प्र.स. कलम ४२८ संपरिक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **सुनिल महादेव भोसले** | १८/०५/२०१४ | २९/०५/२०१४ | भारतीय दंड संहिता कलम ३४१, ३२४, ३२३, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ | निर्दोष मुक्त करण्यात आले | लागू नाही. | लागू नाही. |
| २ | **विजय रघुनाथ शिंदे** | २१/०५/२०१४ | २९/०५/२०१४ | | | | |

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:41:19 +0530

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | **राजु उर्फ यल्लापा कदर** | २१/०५/२०१४ | २४/०५/२०१४ | भारतीय दंड संहिता कलम ३४१, ३२४, ३२३, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ | निर्दोष मुक्त करण्यात आले | लागू नाही. | लागू नाही. |
| ४ | **यासिन मदार शेख** | २१/०५/२०१४ | २४/०५/२०१४ | | | | |
| ५ | **आशिष अंकुश कसबे** | २१/०५/२०१४ | २४/०५/२०१४ | | | | |
| ६ | **संजय उर्फ कांचा गोपाळ विश्वकर्मा** | २१/०५/२०१४ | २४/०५/२०१४ | | | | |

## <u>न्यायनिर्णय</u>

**(जाहिर केल्याचा दि. १७/०४/२०२६)**

आरोपीं विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३४१, ३२४, ३२३, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

**०२.** अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की, दि. ०७/०५/२०१४ रोजी ०९.४० वाजता मौजे विवली ते खेरवसे एस. टी. स्टॉपचे दरम्याने ता. लांजा, जि. रत्नागिरी येथे आरोपी क्र. १ हा सन २०१४ चे लोकसभा निवडणुक वेळी कॉंग्रेस पक्षाचा भांबेड व वेरवली बुद्रुक पंचायत समिती गणाचा पक्ष निरीक्षक म्हणून काम

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:41:25 +0530

करीत होता. निवडणूकीचे काळात कॉंग्रेस पक्षाची वेरवली बुद्रुक गावी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीचे वेळी यातील आरोपी हा वेरवली बुद्रुक येथे गेलेला होता. त्यावेळी फिर्यादी मनोहर श्रीधर रेडीज व आरोपी यांचेत वाद होवून फिर्यादी यांनी शिवीगाळ केली होती. परंतु, सदरचा वाद हा आपसात मिटविणेत आलेला होता.

**०३.** परंतु, त्यानंतर यातील आरोपींनी फिर्यादी यांनी शिवीगाळ केली याचा राग मनात असल्याने आरोपी क्र. २ ते ६ यांना तवेरा गाडी क्र. एमएच ०४ एफआर २९८९ यामधून घेवून येवून फिर्यादी हे त्यांचा मुलगा ओंकार मनोहर रेडीज याचेसह मोटारसायकल क्र. एमएच ०८ वाय ८७४८ वरून वेरवली ते लांजा येत असताना विवली ते खेरवसे स्टॉपचे दरम्याने त्यांचे मोटारसायकलचे पाठीमागून अंगावर घातली असताना यातील साक्षीदार याने मोटारसायकल ही रस्त्याचे साईडला घेत असताना फिर्यादी व साक्षीदार खाली पडले त्यावेळी तवेरा गाडी त्यांचे मोटारसायकलचे आडवी येवून फिर्यादी यांचा मार्ग रोखून यातील आरोपी क्र. २ ते ४ हे खाली उतरून त्यापैकी आरोपी क्र. ३ याने साक्षीदार यांना धरून ठेवले व आरोपी क्र. ३ व ४ यांनी फिर्यादी यांना हातातील रॉडने हाता पायावर मारणेस सुरवात केली. तसेच फिर्यादी यांना जखमी करून व आरोपी क्र. ३ याने मोटारसायकलची चावी काढून घेवून आरोपी निघून गेलेत. त्यामुळे फिर्यादी यांनी लांजा पोलिस ठाणे येथे तक्रार दिली.

**०४.** वरील फिर्यादीवरून पोलिस ठाणे लांजा येथे गुन्हा क्र. २७/२०१४ भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ३४१, ३४ नोंदविण्यात आला. तपासिक अंमलदार यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीं विरूध्द पुरावा मिळून आल्याने तपासिक अंमलदार यांनी अन्वेषण पूर्ण झालेनंतर आरोपीं विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर न्यायालयाने आरोपीं विरूध्द आदेशिका काढली.

**०५.** सरकार पक्षाचे कथनांच्या अनुषंगाने आरोपींवर भारतीय दंड संहिता कलम ३४१, ३२४, ३२३, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ अन्वये दोषारोप (**निशाण क्र. २२**) नोंदविण्यात आला. आरोपींनी गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षेची मागणी केली. आरोपीं विरूध्द कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने आरोपींचे

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:41:32 +0530

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अंतर्गत निवेदन नोंदविण्यात आलेले नाही. त्याबाबत आदेश निशाण १ येथे पारीत करण्यात आलेला आहे.

**०६.** सन्माननीय सरकारी अभियोक्ता व आरोपींचे सन्माननीय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** सरकार पक्षाचे कथनाचे अनुषंगाने पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन निघतात. सदरील मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष मी पुढील कारणावरून देत आहे :-

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि. ०७/०५/२०१४ रोजी ०९.४० वाजता मौजे विवली ते खेरवसे एस. टी. स्टॉपचे दरम्यान, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथे आरोपी क्र. १ ते ६ यांनी सामाईक उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवला आणि आरोपींनी त्यांची तवेरा गाडी क्र. एमएच ०४ एफआर २९८९ ही फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा यांचे मोटारसायकल क्र. एमएच ०८ वाय ८७४८ चे आडवी लावून त्यांना गैर विरोध केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३४१ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतात का? | **सिध्द करीत नाही.** |
| २ | वरील दिवशी वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी सामाईक उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवला आणि फिर्यादीस रॉडने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतात का? | **सिध्द करीत नाही.** |
| ३ | वरील दिवशी वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी | |

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:41:46 +0530

| | | |
|---|---|---|
| | सामाईक उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवला आणि फिर्यादीस मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३२३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतात का? | **सिध्द करीत नाही.** |
| ४ | वरील दिवशी वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी सामाईक उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवला आणि त्या जमावाचे सदस्य झाले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम १४३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतात का? | **सिध्द करीत नाही.** |
| ५ | वरील दिवशी वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी सामाईक उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवला आणि फिर्यादीस मारहाण करणेच्या उद्देशाने त्या जमावाचे सदस्य झाले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम १४७ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतात का? | **सिध्द करीत नाही.** |
| ६ | वरील दिवशी वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ६ यांनी सामाईक उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवला आणि फिर्यादीस प्राणघातक साधनाने मारहाण करणेच्या उद्देशाने दंगा केला व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम १४८ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतात का? | **सिध्द करीत नाही.** |
| ७ | अंतिम आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:41:52 +0530

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ ते ०६ बाबत-**

**०८.** वरील मुद्दा क्र. १ ते ६ हे एकमेकांशी संलग्न असून सर्व मुद्दयांबाबत एकच पुरावा अभिलेखावर आलेला आहे. कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळणेकरीता सर्व मुद्दे एकत्रात चर्चेसाठी घेण्यात आलेले आहेत. निशाण १४८ येथे फिर्यादी व आरोपी क्र. १, ३ व ४ यांनी सदर खटल्याचे तडजोडीस परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. परंतु सदर खटल्यातील गुन्हे हे तडजोडपात्र नसल्याने तो अर्ज नामंजूर करण्यात आला. निशाण १४९ येथे फिर्यादी व आरोपी क्र. १, ३ व ४ यांनी तडजोड झाल्याची पुरशिस दिलेली आहे. सदर पुरशिसमध्ये फिर्यादी यांची आरोपीं विरूध्द कोणतीही तक्रार राहिलेली नाही व सदर केस तडजोडीने निकाली करणेत यावी असे नमूद केलेले आहे. तसेच फिर्यादी यांनी निशाण १५० येथे आपापसात तडजोड झाल्याने याकामी त्यांना आणखी साक्षीदार तपासावयाचे नसल्याबाबत व पुरावा द्यावयाचा नसल्याबाबत पुरशिस दिलेली आहे.

**०९.** अभियोग पक्षातर्फे सदरहू खटल्याचे फिर्यादी मनोहर श्रीधर रेडीज (अ.सा.क्र.१) यांना निशाण १५२ येथे, ओंकार मनोहर रेडीज (अ.सा.क्र.२) यांना निशाण १५३ येथे तपासण्यात आले.

**१०.** सदरहू खटल्याचे फिर्यादी मनोहर (अ.सा.क्र.१) यांनी साक्षीदरम्यान दि. ०७/०५/२०१४ रोजी ते वेरवली येथून लांजा येथे येत असताना त्यावेळेस काय घडले हे त्यांना आठवत नसल्याचे कथन केले व त्यांनी त्यांचे जबाबावरील सही (निशाण अ-१/अ.सा.१) ओळखली. फिर्यादी (अ.सा.क्र.१) हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. परंतु, त्यांनी त्यांचे जबाबातील मजकूर नाकारला. सदर साक्षीदाराच्या साक्षीचे (निशाण १५२) अवलोकन केले असता असे दिसते की, सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नाही.

**११.** त्यानंतर अभियोग पक्षातर्फे तथाकथित घटनेचेवेळी उपस्थित असणारा फिर्यादी यांचा मुलगा ओंकार (अ.सा.क्र.२) याला तपासण्यात आले. परंतु, त्यांनी

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:41:59 +0530

देखील अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांचा उलटतपास घेण्यात आला. परंतु, त्याने त्याचे जबाबातील मजकूर नाकारला. सदर साक्षीदारांच्या साक्षीचे (निशाण १५३) अवलोकन केले असता असे दिसते की, सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करीत नाही.

**१२.** निशाण १५२ येथील फिर्यादी मनोहर (अ.सा.क्र.१) यांचा जबाब, निशाण १५३ येथील फिर्यादी यांचा मुलगा ओंकार (अ.सा.क्र.२) याचा जबाब, अभिलेखावरील कागदपत्रे व तडजोड पुरशिस (निशाण १४९) या सर्वांचे अवलोकन केल्यानंतर प्रस्तुत खटल्यात आरोपीं विरूध्द कोणताही गुन्हा शाबीत होत नाही. अभिलेखावरून असे दिसते की, आरोपी क्र. ५ व ६ यांचे विरूध्द नॉन बेलेबल वॉरंट (N.B.W.) बऱ्याचवेळा issue होवून देखील ते लागू झालेले नाही. दि. ०९/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये आरोपी क्र. ५ व ६ यांचे विरूध्द फौ. प्र. सं. कलम ८२ जाहीर उद्घोषणा (proclamation) आदेश पारीत करण्यात आलेला आहे. त्यानंतर देखील आरोपी क्र. ५ व ६ हजर झालेले नाहीत. त्यानंतर आरोपी क्र. ५ याने निशाण ८० येथे सदर वॉरंट रद्द करण्यासाठीचा अर्ज दिला होता. त्या अर्जावर दि. ०२/०४/२०१८ रोजी आदेश होवून आरोपी क्र. ५ याचा जाहीरनामा न बजावता परत मागविण्यात आलेला आहे. आरोपी क्र. ६ याचे विरूध्द फौ. प्र. सं. कलम २९९ अन्वये पुरावा घेण्यात यावा असा आदेश दि. १२/०४/२०२३ रोजी पारीत करण्यात आलेला आहे. त्यानंतर देखील सदर आरोपीं विरूध्द N.B.W. आदेश होवून देखील ते न्यायालयात हजर नाहीत. दि. ०९/०२/२०१८ रोजीच्या आदेशावरून आरोपी क्र. ५ व ६ हे फरारी आहेत असे दिसून येते. परंतु, वर म्हटल्याप्रमाणे आरोपी क्र. १ याचे विरूध्द जाहीरनामा दि. ०२/०४/२०१८ रोजीच्या आदेशाने न बजावता परत मागविण्यात आलेला आहे.

**१३.** अभिलेख तपासले असता आरोपी क्र. २ याचे विरूध्द देखील दि. ३१/०१/२०२० रोजी निशाण १ येथे 'फरारी' असे म्हणून त्याचे विरूध्द फौ. प्र. सं. कलम ८२ खाली जाहीरनाम्याचा आदेश पारीत करण्यात आला आहे. वर नमूद चर्चा व अभिलेखावरून आरोपी क्र. २ व ६ यांचे विरूध्द फौ. प्र. सं. कलम ८२

JOSHI SNEHAL RAJAN
Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:42:06 +0530

जाहीरनाम्याचा आदेश असल्याचे दिसून येते. सदरचा खटला हा सन २०१४ मधील असुन जूना आहे. या खटल्याकामी निशाण १४९ व निशाण १५० येथील पुरशिसप्रमाणे तडजोड झालेली निदर्शनास येते. त्यामुळे केवळ आरोपी क्र. २ व ६ हे फरारी असल्याचे कारणासाठी सदर खटला प्रलंबित ठेवणे उचित होणार नाही. आज आरोपी क्र. १, ४ व ५ हे न्यायालयासमक्ष हजर आहेत. आरोपी क्र. ३ हा आज रोजी गैरहजर असून त्याचा निशाण १६९ येथील गैरहजेरीचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. प्रस्तुत कामामधील आरोपी क्र. ५ याची निशाण १७० येथील पुरशिस व त्या अनुषंगाने निशाण १७१ येथील आरोपी क्र. १, ४ व ५ यांचा फौ. प्र. सं. कलम ३५३(६) अन्वये अर्ज व त्या अर्जावर पारीत करण्यात आलेल्या सविस्तर आदेश व प्रस्तुत खटला जूना असून फिर्यादी व त्याचे मुलाने याकामी दाखल केलेली तडजोड पुरशिस (निशाण १४९ व १५०) या सर्वांचा एकत्रीत विचार करता प्रस्तुत खटल्याकामी फौ. प्र. सं. कलम ३५३(६) अन्वये आरोपी क्र. २, ३ व ६ यांचे गैरहजेरीमध्ये न्यायनिर्णय घोषित करण्यात येतो. तरी वरील सर्व चर्चेअंती मी मुद्दा क्र. ०१ ते ०६ चे निष्कर्ष सिध्द करीत नाही असे नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ०७ बाबत-**

**१४.** अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केल्यानंतर सदरहू खटल्यातील जप्त मुद्देमालातील तवेरा वाहन हे त्याचे मालकास देण्याबाबत न्यायालयाने आदेश पारीत केले असल्याचे दिसून येत आहे. सदर आदेशाचे अनुषंगाने सदरचे जप्त वाहन हे राजेश शांताराम कारभारी याचे ताब्यात दि. ०७/०७/२०१४ रोजी पंचनामा करून देण्यात आले असल्याचे दिसून येत आहे. वरील चर्चेअंती मी मुद्दा क्र. ०७ चे उत्तरात पुढील अंतिम आदेश पारीत करीत आहे :-

## आ दे श

१. **आरोपी क्र. १ सुनिल महादेव भोसले, आरोपी क्र. २ विजय रघुनाथ शिंदे, आरोपी क्र. ३ राजु उर्फ यल्लापा कदर, आरोपी क्र. ४ यासिन मदार शेख, आरोपी क्र. ५ आशिष अंकुश कसबे व आरोपी क्र. ६ संजय उर्फ कांचा गोपाळ विश्वकर्मा** यांना भारतीय दंड संहिता कलम ३४१, ३२४, ३२३, १४३, १४७,

JOSHI SNEHAL RAJAN Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN Date: 2026.04.17 17:42:12 +0530

१४८ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(1) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे पूर्वीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल एक पांढऱ्या रंगाची तवेरा गाडी तीचा इंजिन क्र. 3GM153028 असा असून तीचा चेसीस क्र. MH04042013A1984 याचा अंतरिम ताबा राजेश शांताराम कारभारी यांना देण्यात आलेला होता. सदरचा ताबा अपिल कालावधी समाप्तीनंतर कायम करण्यात येत आहे.

४. जप्त मुद्देमाल एक लोखंडी रॉड व एक लोखंडी सळी हा अपिल कालावधीनंतर लिलाव करणेत यावा व त्यातून मिळणारी रक्कम ही सरकार जमा करावी.

५. या निर्णयाच्या विरोधात अपीलकामी अथवा अर्जाच्या अनुषंगाने वरीष्ठ न्यायालयात हजर राहण्यासाठी आरोपी क्र. १ ते ६ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) अन्वये प्रत्येकी रक्कम रूपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा सहा महिने कालावधीचे जामिन बंधपत्र द्यावे. आरोपी क्र. २ व ६ मिळून आल्यानंतर त्यांचेकडून जामीना संदर्भातील या आदेशाची योग्य ती पूर्तता करून घेण्यात यावी. आज रोजी आरोपी क्र. ३ हा गैरहजर असून त्याचा देखील या आदेशाप्रमाणे तो मिळून आल्यानंतर त्याचेकडून जामीना संदर्भातील या आदेशाची पूर्तता करून घेण्यात यावी.

६. या न्यायनिर्णयाची माहिती ना. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील फौजदारी अपिल एस. टी. क्र. ३९०/२०१९ चे न्यायनिर्णयातील निर्देशानुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत )

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:42:19 +0530

**दिनांक १७/०४/२०२६.** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण लांजा.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा,**

**जि.रत्नागिरी.**

**परिशिष्ठ-I**

**भाग 'क'**

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(**iii**))

**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारी साक्षीदारांची यादी**

| क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाण |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | मनोहर श्रीधर रेडीज | फिर्यादी | १५२ |
| अ.सा.२ | ओंकार मनोहर रेडीज | साक्षीदार | १५३ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाण |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाण |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी**

**अ. सरकारी**

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:42:26 +0530

| क्रमांक | निशाण | वर्णन |
|---|---|---|
| १ | अ-१/अ.सा.१ | जबाबावरील फिर्यादीची सही. |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाण | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयीन निशाण**

| क्रमांक | निशाण | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | - | एक पांढऱ्या रंगाची तवेरा गाडी तीचा इंजिन क्र. 3GM153028 असा असून तीचा चेसीस क्र. MH04042013A1984 |
| २ | - | एक लोखंडी रॉड |
| ३ | - | एक लोखंडी सळी |

JOSHI SNEHAL RAJAN

Digitally signed by JOSHI SNEHAL RAJAN
Date: 2026.04.17 17:42:32 +0530

**दिनांक १७/०४/२०२६.** **(एस. आर. जोशी)**

**ठिकाण लांजा.** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, लांजा,**

**जि.रत्नागिरी.**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this pdf file Judgment/ Order are same word as per original Judgment. | | |
| Name of Stenographer | :- | S. D. Chavan |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Lanja |
| Date of decision | :- | 17/04/2026 |
| Order Signed by P.O. on | :- | 17/04/2026 |
| Order uploaded on | :- | 17/04/2026 |